# वर्ग - द्वितीय वर्ष कला - मराठी जनरल (G 2)

## विषयाचे नाव - भाषिक कौशल्य विकास आणि आधुनिक मराठी साहित्यप्रकार : कादंबरी

### घटक अ) २) कळफलक प्रकार : इनस्क्रिप्ट, फोनेटिक

**कळफलक म्हणजे काय ?**

**कळफलक (कीबोर्ड) संगणक किंवा समान डिव्हाइसमध्ये मजकूर,** वर्ण आणि अन्य आज्ञा पाठविण्यासाठी (इनपुट) वापरल्या जाणाऱ्या संगणकाच्या (कॉम्प्यूटर) हार्डवेअरचा भाग आहे. कळफलक (कीबोर्ड) हा डेस्कटॉप सिस्टममध्ये बाह्य उपकरण म्हणजे मुख्य संगणकापासून वेगळा असतो. तर टॅब्लेट पीसीमध्ये "व्हर्च्युअल" (अंतर्गत) आहे. असे असले तरीही, तो पूर्ण संगणक प्रणालीचा एक आवश्यक भाग आहे.

**मायक्रोसॉफ्ट आणि लॉजिटेक बहुधा सर्वात लोकप्रिय भौतिक कीबोर्ड निर्माता आहेत,** परंतु बरेच हार्डवेअर निर्मात्यांनी देखीलकळफलकाची (कीबोर्ड) निर्मिती केली आहे. कळफलकामध्ये संख्या, अक्षरे, चिन्हे आणि बाण असे विविध कीज म्हणजे बटण असतात.

**कळफलकाचे मुख्यत: वायरलेस कळफलक आणि वायर्ड कळफलक** असे दोन प्रकार पडतात. वायरलेस कीबोर्ड हे ब्ल्यूटूथ किंवा आरएफ रिसीव्हरद्वारे संगणकाशीजोडलेले असतात. तर वायर्ड कीबोर्ड हे **यूएसबी प्रकार एक कनेक्टर वापरून, यूएसबी केबलद्वारे मदरबोर्डला जोडले जातात. लॅपटॉपवरील कीबोर्ड एकात्मिक असतात, परंतु तांत्रिकदृष्ट्या ते "वायर्ड" म्हणून ओळखले जातात. अर्थात संगणकासह कळफलक वापरण्यासाठी वायरलेस आणि वायर्ड** या दोन्हीनांही विशिष्ट उपकरणांची आवश्यकता असते टॅब्लेट, फोन्स आणि टच इंटरफेससह इतर

संगणकांमध्ये सहसा फिजिकल कीबोर्ड समाविष्ट नाहीत. तथापि, बहुतेक USB receptacles किंवा वायरलेस तंत्रज्ञानाचा वापर करतात; जे बाह्य कीबोर्डला जोडण्यास परवानगी देतात.

बहुतेक **आधुनिक मोबाईल फोन स्क्रीन आकार वाढविण्यासाठी ऑनस्क्रीन किबोर्ड** वापरतात. जेव्हा आवश्यक असेल, तेव्हा कीबोर्डचा वापर केला जाऊ शकतो. परंतु त्यानंतर त्याच स्क्रीन स्पेस इतर गोष्टींसाठी वापरल्या जाऊ शकतात. **उदा. व्हिडिओ पाहणे. जर फोनमध्ये एक कीबोर्ड असेल तर तो कधीकधी स्लाइड-आउट, लपलेला कीबोर्ड असतो; जो स्क्रीनच्या मागे असतो.** हे दोन्ही उपलब्ध स्क्रीन जागा वाढविते. तसेच लॅपटॉप आणि नेटबुकमध्ये एकत्रित कीबोर्ड असतात. परंतु, टॅब्लेटप्रमाणे, यूएसबीद्वारे जोडलेले बाह्य कीबोर्ड असू शकतात


थोडक्यात कळफलक ही संगणकाची इनपुट डीव्हाईस आहे कळफलकाच्या साहाय्याने संगणकाची संवाद साधणे शक्य होते संगणकाला माहिती देण्यासाठी किंवा विशिष्ट सूचना देण्यासाठी कळफलकाचा वापर होतो. कळफलक सामान्यतः टाईपरायटरसारखा असतो. मात्र युनिकोडच्या वापरपद्धतीनुसार कळफलकाच्या नव्याने दोन पद्धती बनतात. त्यामध्ये इनस्क्रिप्ट कळफलक आणि फोनेटिक कळफलक पद्धत असे दोन प्रकार आपणास पाहावयास मिळतात.

### १) इनस्क्रिप्ट कळफलक म्हणजे काय ?

इनस्क्रिप्ट या पद्धतीमध्ये आपण ज्या प्रकारे मराठीत लेखन करतो, त्याप्रमाणे अक्षरे व त्यांचा काना, मात्रा, वेलांटी, उकार लिहित जातो. या पद्धतीत इनस्क्रिप्ट कळफलकाची माहिती जाणून घेऊन त्या दृष्टीने आवश्यक तो सराव करणे गरजेचे असते. काही तासांच्या सरावाने कळफलकातील कळांच्या जागा लक्षात राहतात व नंतर सरावाने निश्चित वेग वाढतो. या पद्धतीत मराठी कळफलकाप्रमाणे वरील कळा दाबून लिहित जायचे असते. मराठी वर्णमालेतील सर्व मुळाक्षरे ‘अ’ ते ‘अः’ पर्यंतचे सर्व स्वर आणि ‘क’ ते ‘ज्ञ’ पर्यंतची व्यंजने तसेच वापरात येणारे काना, मात्रा, उकार, वेलांटी इत्यादी सर्वांसाठी

ठराविक कळा निश्चित केल्या असतात. त्या कळांचा उपयोग करून मराठी लेखनासारखेच टंकलेखन करावयाचे असते.

थोडक्यात हा कळफलक टाईपरायटर प्रमाणेच असतो. उदा. यात ‘भारत’ असा शब्द लिहावयाचा असल्यास भ+आ+र+त असा लिहिणे अपेक्षित असते. खालील इनस्क्रिप्ट कळफलक पाहा.




वरील की बोर्डमध्ये ‘A’ या अक्षरावर ‘ओ’ असे अक्षर दिसते. CapsLk केल्यावर की - बोर्ड वरील अक्षरे बदलतात. उदा. ‘I’ असेल तर ‘घ’ आणि ‘i’ असेल तर ‘ग’ असे येते. अधिक माहितीसाठी वरील इनस्क्रिप्ट कळफलक पाहा. अशाप्रकारे आपल्याला सहज या की - बोर्डची ओळख होईल.

**मराठी इनस्क्रिप्ट कळफलकाचा वापर कसा करावा ? -**

मराठी इनस्क्रिप्ट कळफलक जर आपण आपल्या संगणक, leptop अथवा mobileमध्ये instrol असेल तर त्याचा वापर करताना कोणतेही Application सुरुवातीला संगणकावर open

करायचे. Alt हे बटण दाबून नंतरShift दाबायचे. आपला की बोर्ड मराठीत होईल. मग आपण मराठीत टाईप करू शकतो. पण आपल्याला जर इंग्रजी की बोर्डचा वापर करायचा असेल तर पुन्हाAlt, Shift ही की प्रेस करायची आहे. तर अशा रीतीने आपण इनस्क्रिप्ट कळफलकाचा वापर करू शकतो.

**इनस्क्रिप्ट लेआउटचा वापर करून अल्पावधीत मराठी टंकलेखन शिकण्याची युक्ती-**

सर्वप्रथम संगणकावर Microsoft Office Word Document मधील फाइल ओपन करा. नंतर ISM वर क्लिक करून कीबोर्ड मध्ये इन्स्क्रिप्ट हा पर्याय निवडावा. नंतर ISM सेटिंगमध्ये स्क्रिप्ट मधील scroll Lock हे बटन दाबावे. तसेच सेटिंगमध्ये बायलिंग्वल हा पर्याय निवडावा. असे केल्याने आपल्याला मराठी परिच्छयेदात एखादी इंग्रजी ओळटंकलिखित करावयाची असेल तर Lock की पुन्हा दाबल्याने इंग्रजी टंकलेखनआपण पुन्हा करू शकतो.

इनस्क्रिप्ट लेआउट हे मराठी टाईपराईटर या लेआउटपेक्षा वेगळा आहे. इनस्क्रिप्ट लेआउटचे वैशिष्ट्य म्हणजे मराठीतील बहुतांश अक्षरांची कीही मराठी वर्णमालेतील अक्षरांच्या क्रमवारीनुसार आली आहे. उदा. क, ख, ग, घ, त, थ, द, ध, प, फ, ब, भ याप्रमाणे आहे. यामुळे इन्स्क्रिप्ट लेआउट मधील मराठी टंकलेखन हे मराठी टाईपरायटरच्या तुलनेत अतिशय सोपे आहे. यामध्ये मराठी लेआउट लक्षात राहण्यासाठी सरावाची गरज नसते.

**२) फोनेटिक कळफलक पद्धती -**

फोनेटिक कळफलक पद्धती ही ध्वनीवर आधारित असून यात मराठी शब्द हे टंकित करताना ते कसे कानाला ऐकू येतात; त्याप्रमाणे त्यातील प्रत्येक अक्षराचे सरळ सोपे इंग्रजी स्पेलिंग लिहीत जाणे या पद्धतीत नेहमीच्याच इंग्रजी कळफलकाचा उपयोग होत असल्याकारणाने नवीन कळफलकाच्या सरावाची आवश्यकता नसते. थोडी जुजबी माहिती घेऊन लगेचच मराठी, हिंदी लिहिणे सुरू करता येते या प्रकारातील मराठी टंकलेखन हे इंग्रजी कळफलकावर अवलंबून असते उदा. ‘भारत’ हा शब्द

लिहायचा असेल तर इंग्रजीमध्ये bhaa+ra+ta असा लिहावा लागेल. ज्यांना हिंदी टायपिंग माहिती नाही, ते देखील देवनागरी लिपीचा वापर करून हिंदीमध्ये आरामात लिहू शकतात. ज्या फोनेटिक पद्धतीत पूर्ण व्यंजन लिहावयाचे असेल, तेव्हा त्याच्या इंग्रजी शब्दानंतर ‘A’ हे वर्णाक्षर लिहावे लागते. पण जर ते व्यंजन अर्धे लिहायचे असेल, तर इंग्रजी वर्णाक्षरानंतर ‘A’ लिहिण्याची आवश्यकता नाही.

थोडक्यात ही टंकलेखन पद्धती मायक्रोसोफ्ट विंडोज या प्रणालीसाठी उपयुक्त आहे. अर्थात इनस्क्रिप्ट किंवा फोनेटिक कोणतीही पद्धत असो, त्याद्वारे मराठी टायपिंग करता येणे महत्त्वाचे असते. इनस्क्रिप्ट हा कळफलक, जे टायपिंग करणारे टंकलेखक आहेत; त्यांच्यासाठी उपयुक्त आहे जलद टंकलेखन करण्यासाठी इन्स्क्रिप्ट पद्धती अतिशय उपयुक्त आहे. मात्र त्यासाठी सराव आवश्यक आहे. एकदा योग्य तो सराव झाला की इन्स्क्रिप्ट कळफलक सहज वापरता येतो. उदा. ‘करमरकर’ हे सोपे आडनाव टाईप करायचे असेल, इन्स्क्रिप्ट कळफलकात ‘kjcjkj’ एवढेच टाईप करायला लागते. मात्र फोनेटिकमध्ये ‘करमरकर’ या शब्दाला ‘karamarakar’ एवढे टाइप करावे लागते. तसेच फोनेटिकमध्ये थोडासा तरी डोक्याचा वापर करावा लागतो. निव्वळ प्रतिक्षिप्त कीद्वारे टायपिंग करणे त्यामानाने अवघड असते. थोडक्यात फोनेटिक कळफलकाद्वारे केले जाणारे टंकलेखन इन्स्क्रिप्ट कळफलकाच्या तुलनेत थोडेफार किचकट आहे; असे म्हणता येते. आता आपण फोनेटिक कळफलक पाहू.




यामध्ये ‘G’ या अक्षरासाठी ‘घ’ हे व्यंजन आहे; तर ‘g’ साठी ‘ग’ हे व्यंजन आहे

वरील प्रकारे आपल्याला इन्स्क्रिप्ट कळफलक आणि फोनेटिक कळफलक म्हणजे काय? ते समजून घेता येईल.

-----------------------------------------------------------------------------------------------

SDS HRM Marathi